दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २५७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१७ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

चौल येथील दत्त मंदिरात चोरी, ४० किलो चांदी नेली चोरून

चोरटा सीसीटीव्हीत कैद

दै.रायगड नगरी । अलिबाग

अलिबाग तालुक्यातील चौल भोवाळे पर्वत निवासी श्री दत्त मंदिरात चांदी चोरी केल्याची घटना शुक्रवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. श्री दत्त मूर्तीच्या मागे भिंतीला लावलेली ४० किलो चांदी चोरट्याने चोरली आहे. चोरी करणारा चोर हा सीसीटिव्ही मध्ये कैद झाला आहे. या चोरट्या विरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक दयानंद गावडे, रेवदंडा पोलीस यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे.

चौल भोवाळे पर्वत निवासी श्री दत्त मंदिर हे प्रसिद्ध आहे. डिसेंबर महिन्यात दरवर्षी मोठी यात्रा याठिकाणी भरत असते. नुकतीच ७ ते ११ डिसेंबर अशी पाच दिवस यात्रा संपन्न झाली होती. चारच दिवसांनी शुक्रवारी १६ डिसेंबर रोजी चोरट्याने मंदिरातील चांदीवर डल्ला मारला आहे. त्यामुळे एकच खळबळ तालुक्यात माजली आहे. शुक्रवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे.

श्री दत्त मंदिरात चोरी झाल्याचे कळल्यानंतर त्वरित रेवदंडा पोलिसांना घटनेची माहिती स्थानिकांनी दिली. त्यानंतर रेवदंडा पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. मंदिरात असलेल्या सीसीटिव्हीमध्ये चोरी करणारा चोर कैद झाला आहे. चोर हा एक आहे की त्याचे अन्य साथीदार आहेत. याबाबत पोलीस तपास सुरू केला आहे. गेल्या आठवड्यात पाच दिवस यात्रा असल्याने या काळात चोरट्यांनी रेकी केली असल्याचा संशय आहे. त्यानंतर त्यांनी चांदिवर डल्ला मारला आहे. मंदिरात भिंतीला लावलेली ४० किलो चांदी ही अज्ञात चोरट्याने पळवली आहे. त्यामुळे या चोरट्यांना शोधण्याचे आव्हान रायगड पोलिसांना आहे.

मालमत्ता कर रद्द करण्यासाठी महानगरपालिकेसमोर धरणे आंदोलन

कोणत्याही परिस्थिती पनवेल महानगरपालिकेला मालमत्ता रद्द करण्यासाठी भाग पाडणार : बबनदादा पाटील

दै.रायगड नगरी । पनवेल

कोणत्याही परिस्थिती पनवेल महानगरपालिकेला मालमत्ता रद्द करण्यासाठी भाग पाडू यासाठी अजून टतीव्र आंदोलन छेडावे लागले तरी बेहत्तर पण पनवेल करांना न्याय मिळवूनच देणार असा ठाम विश्वास आज मालमत्ता कर विरोधात धरणे आंदोलनाप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख व पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

या आंदोलनात आमदार बाळाराम पाटील, ९५ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश ठाकूर, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांच्यासह संघर्ष समितीचे सरचिटणीस सुधाकर पाटील, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, सचिव सुदाम पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, सूरदास गोवारी, सतीश पाटील, नारायणशेठ घरत, आर सी घरत, रमाकांत पाटील, रवींद्र भगत, भरत पाटील, योगेश तांडेल, प्रदीप ठाकूर, प्रवीण जाधव, सदानंद शिर्के, संतोष गायकर, गणेश कडू, सुनील बहिरा यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी पालिका प्रशासन आणि सत्ताधारी भाजप विरोधात उपस्थित नेत्यांनी टीकेची झोड उठवली. धरणे आंदोलनात बोलताना आमदार बाळाराम पाटील यांनी या वाढीव मालमत्ता करप्रणालीला सत्ताधारी भाजप जबाबदारी असल्याचे सांगितले.आमदार प्रशांत ठाकुर यांच्यावर टीका करत नादान आमदारांमुळे आज सर्वसामान्यांवर या अवाजवी झिजिया कराला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप केला. हिवाळी अधिवेशनात पनवेल महानगरपालिकेच्या वाढीव मालमत्ता कर प्रणाली विरोधात लक्षवेधी देखील उपस्थित करणार असल्याचे आमदार पाटील यांनी याठिकाणी सांगितले. ९५ गाव कृती समितीचे अध्यक्ष ऍडव्होकेट सुरेश ठाकुर यांनी सांगितले कि;आम्हाला मालमत्ता करप्रणाली मान्य नाही.हि प्रणाली रद्द केल्याशिवाय आमचे आंदोलन थांबणार नसल्याचे ठाकुर यांनी स्पष्ट केले नाही.यावेळी मोठ्या संख्येने ग्रामीण भागा-तील नागरिक उपस्थित होते.

या धरणे आंदोलन दरम्यान पालिका प्रशासनाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी उपायुक्त गणेश शेटे,उपायुक्त सचिन पवार यांनी पोलिसांच्या मध्यस्थीने आंदोलन कर्त्यांची भेट घेत पालिका प्रशासनाची बाजु सर्वांसमोर मांडली.मात्र पालिकेच्या शिष्टमंडळाने दिलेल्या उत्तरात आंदोलनकर्त्यांचे समाधान न झाल्याने धरणे आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय आंदोलन कर्त्यांनी घेतला.कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणुन पोलिसांचा चोख बंदोबस्त याठिकाणी ठेवण्यात आला होता.

पनवेल महानगरपालिकेने लादलेला मालमत्ता कर हा अवाजवी असल्याचे सांगत ९५ गाव नवी मुंबई, नैना व इतर प्रकल्पग्रस्त समिती, गाव समित्या व सामाजिक संस्थांच्या वतीने आज पनवेल महानगरपालिका मुख्यालया समोरील महात्मा गांधी उद्यानात धरणे आंदोलन करत कर प्रणाली रद्द करण्याची मागणी करण्यात आली. या मोर्चाला महाविकास आघाडीने पाठिंबा जाहीर दिला आहे. टप्प्याटप्प्याने २३ डिसेंबर पर्यंत हे आंदोलन चालणार असून आंदोलनाच्या पहिल्या दिवशी जुई, कामोठे, नौपाडा येथील ग्रामस्थांनी याठिकाणी धरणे आंदोलन दिले.

रानडुक्कराची शिकार करणाऱ्यांना अटक ; रोहा वनविभागाची कारवाई

दै.रायगड नगरी । रोहा

रोहा वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून रानडुक्कराची शिकार करणाऱ्यांना अटक केली असून या कारवाई मध्ये डुकराचे मांस आणि जंगली प्राण्यांची शिकार करण्यासाठी वापरण्यात येणारी हत्यारे वन विभागाने जप्त केली आहेत.

रोह्याचे उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत यांना लांढर जवळील कं.नं.२८६ जंगल हद्दीत रात्रीच्या वेळेत काही शिकारी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वनखात्याच्या फिरतीपथकातील वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे, संजय चव्हाण, निलेश वाघमारे, विकास राजपूत, वैभव बत्तीसे, निखिल पाटील, मोरेश्वर भगत जंगलात झुडपांचा आधार घेऊन संध्याकाळी जाऊन बसले. रात्र उलटल्यावर पहाटे त्यांना आरोपी महादेव कुशा पिंगळा व ३ सहकारी इसम जंगलात संशयास्पद हालचाली करत असल्याचे दिसले. वनाधिकाऱ्यांना पाहताच त्यांची बोबडी वळली. परंतु क्षणांत पिंगळा यांचे तीन सहकाऱ्यांनी पळ काढला आणि ते दिसेनासे झाले. पिंगळा यांना अटक करून सखोल चौकशी केली असता, त्याच्या कडे ब्लँकेटमध्ये आणि दोन मोठ्या बॅग मध्ये डुकराचे मांस आढळले. त्याच्याकडील जंगली प्राण्यांची शिकार करण्यासाठी वापरण्यात येणारी हत्यारे सुद्धा जप्त करण्यात आली.

त्याच्यावर वन कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या शिकाऱ्यांनी किती प्राण्यांच्या शिकारी केल्या आहेत, याचा तपास वनाधिकाऱ्यांनी सुरू केला आहे.

या शिकाऱ्यांची लवकर चौकशी व्ह-ावी, आणि न्यायालयात कठोरात कठोर शिक्षा होईल यादृष्टीने कार्यवाही व्हावी अशी मागणी पर्यावरण प्रेमींनी केली आहे.

एटीएम फोडून ५७ लाख रूपयांची रोकड लंपास करणारी आंतरराष्ट्रीय टोळी जेरबंद

दै.रायगड नगरी । अलिबाग

पेण येथील एस.बी.आय.चे एमटीएम सेंटर फोडून ५७ लाख रुपयाची रोकड लंपास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले असून ४ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

पेण मौजे एस.बी.आय. एटीएम. सेंटर, सनसिटी बिल्डींग, पेण येथे घडलेला असुन अज्ञात आरोपीत यांनी सदर एस.बी. आय. एटीएम. सेंटर मधील एटीएम. मशीन गॅस कटरचे सहाय्याने फोडून त्यातील ५६,३४,८००/- रूपये रोख रक्कम चोरी करून गेले होते. सदर गुन्हयाची तिव्रता पाहता सदरचा गुन्हा उघडकीस आणणेकरीता तत्कालीन मा.पोलीस अधीक्षक अशोक दुधे, मा.अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनानुसार दयानंद गावडे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शाखा, रायगड यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच पेण पोलीस ठाणे कडील पथक तयार करण्यात आले होती.

तपसाचे दरम्यान गुन्हयाचे घटनास्थळी प्राप्त सी.सी. टी.व्ही. फुटेजचे आधारे आरोपीत हे ता.नुह (मेवात), राज्य हरीयाना येथील असल्याची खात्री झाली होती. परंतु ब-याच वेळा पोलीस पथक पाठवूनही ते आरोपी मिळत नव्हते. तपासादरम्यान तावडू पोलीस ठाणे, जि.नुह, राज्य हरियाणा ४१९/२०२२, भा.द.वि. सं.कलम ३९९, ४०२ आम्र्स ॲक्ट ३, २५ या गुन्हयामध्ये १) वसीम अकरम अखतर हुसैन, वय.३०, रा.टुनडलाका, ता.पुन्हाना, जि.नुह, २) माजीद जुम्मा खान, वय.२५, रा.पिंपरोली, ता.पुन्हाना, जि.नुह, राज्य. हरीयाना असे आरोपीत यांना अटक केले असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर आरोपीत यांनी पेण पोलीस ठाणे येथील एटीएम कटींगचा गुन्हा केला असल्याची शक्यता असल्याने तात्काळ स्था.गु.अ.शा. रायगड अलिबाग कडील तपास पथक सदर आरोपीत यांचेकडे चौकशी करणेकरीता रवाना करण्यात आले होते. सदर तपास पथकाने वरील आरोपीत यांचेकडे सखोल विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यामुळे सदर दोन्ही आरोपीत यांना पेण पोलीस ठाणे या गुन्हयामध्ये वर्ग करून घेण्यात आले.

सदर आरोपीतांकडे गुन्हयाचे अनुषंगाने केले तपासामध्ये त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे साथीदार ३) हसन खान व ४) साकीर अब्दुल रहीम खान यांचे मदतीने केला असल्याचे त्यांनी कबुल केले. सदर आरोपीत यांना गुन्हयाचे कामी अटक करण्यात आले असून त्यांचेकडून एकूण सुमारे ८,५०,०००/- रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक, महेश कदम, स्था.गु.अ.शा. रायगड अलिबाग हे करीत आहेत.

विषारी सांडपाणी खोपटा खाडी परिसरात सोडल्याने शेकडो माशांचा मृत्यू

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील प्रकल्पातील विषारी सांडपाणी प्रकल्पा (कंटेनर यार्ड)च्या आवारा बाहेर असलेल्या खाडीत सोडल्याने खोपटा, पागोटे,नवघर,भेंडखळ खाडीतील शेकडो मासे मरून पडले आहेत. जस जसे हे विषारी पाणी वाहून दुसऱ्या खाडीत, तलावांमध्ये जाईल तसे तसे आणखी मासे हे (दुषित) विषबाधा झालेल्या पाण्यामुळे मरुन पडतील अशी भिंती मनसेचे तालुकाध्यक्ष सत्यवान भगत, शिवसेनेचे माजी विभागप्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते अनिल पाटील व्यक्त यांनी व्यक्त केली आहे.

उरण तालुक्यातील भेंडखळ, नवघर, पागोटे, बांधपाडा, कोप्रोली, दिघोडे, वेश्वी, चिर्ले, विधणे ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात मालाची हाताळणी करणारे कंटेनर यार्ड निर्माण झाले आहेत. अशा यार्ड मध्ये शासकीय नियमांची पायमल्ली करून मोठ्या प्रमाणात केमिकल मिश्रित द्रव्य असले ड्रमची, हजार टन क्षमतेच्या हायड्राची साठवून केली जाते. त्यामुळे लिकेज झालेल्या ड्रम, हायड्रा मधून किंवा यार्ड मध्ये सर्व्हिसिंग करण्यात येणाऱ्या हायड्रा, कंटेनर मधिल केमिकल, विषारी पाणी हे वारंवार नाल्यातून खाडी किनाऱ्यावर सोडले जात आहे.

त्यामुळे अशा दुषित विषारी पाण्यामुळे तलावा मधिल, खाडीतील विविध जातींचे मासे मरण पावले आहेत.

या अगोदर बांधपाडा,कोप्रोली ग्रामपंचायत हद्दीतील ग्लोबिकॉन या माल हाताळणी कंटेनर यार्ड कडून केमिकल मिश्रित द्रव्य खाडीत सोडल्याने मासे मरण पावले होते.यासंदर्भात मनसेचे तालुकाध्यक्ष सत्यवान भगत यांनी उरण तहसील, प्रदुषण नियंत्रण मंडळ याकडे तक्रार दाखल केली असता घटना स्थळावर शासकीय अधिकारी वर्गाने पाहणी केली. तसेच भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील खाडीतील विविध जातींचे मासे मरण पावल्याने ग्रामपंचायत कडून व सामाजिक कार्यकर्ते याकडून ही तक्रार दाखल करण्यात आली होती.परंतु संबंधित प्रशास-नाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले होते.

या घटनेनंतर पुन्हा गुरुवार दि.१५ डिसेंबर २०२२ रोजी पागोटे, भेंडखळ, बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्यावरील पाण्यात जिताडा, करपाल, बोईट, कोळंबी, कटला, काळामासा, घोया यासारखी महागडे मासे मरून पडल्याची दुदैवी घटना घडली आहे. सदर मासे हे खाडीत सोडण्यात आलेल्या केमिकल मिश्रित विषारी पाण्यामुळे मरण पावले असल्याचे येथील मासेमारी करणाऱ्या बांधवांकडून सांगण्यात येत आहे.

एकंदरीत कंटेनर यार्ड मधिल केमिकल मिश्रित कंटेनर धुतलेले पाणी प्रकल्पातील नाल्यात सोडल्यामुळे हा प्रकार झाला आहे. मात्र प्रद-ुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी हे उरण तालुक्यात वारंवार घडणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याने व शेतकऱ्यांच्या या परिसरातील रहिवाशांच्या तक्रारी कडे आर्थिक हित संबंध जपत दुर्लक्ष करीत असल्याने या परिसरातील शेतकऱ्यांना, रहिवाशांना न्याय मिळत नाही अशी संतप्त प्रतिक्रिया मनसेचे तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत यांनी या घटनेसंदर्भात व्यक्त केली आहे.

मुरूड खोराबंदर रात्रीच्या वेळी बनलेय तळीरामांचा अड्डा

दारुच्या बाटल्यांचा, फोडलेल्या काचांचा खचामुळे अपघाताची शक्यता

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरुड तालुक्यातील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात देशविदेशातील पर्यटक येत आहेत. हा किल्ला पाहण्यासाठी मुरुड शहरापासून फक्त १ किमी अंतरावर खोरा बंदर आहे. पण या ठिकाणी रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन अनेक तळीरामांनी अड्डा बनविला आहे. या ठिकाणी दारुच्या बाटल्यांचा खच नेहमी दिसून येत आहे. बाटल्यांचा काचा फोडलेल्या सापडत आहेत त्यामुळे पर्यटक व स्थानिकांना अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या बंदरात दिवसभर पर्यटकांची रेलचेल असते. त्यानंतर सायंकाळी वाहतूक बंद केली जाते. एकदा अंधार पडला की या ठिकाणी तळीरामांची पावले दारुच्या बाटल्या, चकणा, पाण्याच्या बाटल्या, सोडा बॉटल व शितपेय घेऊन येऊ लागतात. या ठिकाणी कोणतेही सुरक्षा रक्षक नसल्याने या तळीरामांचे चांगलेच फावते आहे. येताच तर येतात दारु पिऊन झाल्यावर काचेच्या बाटल्या फोडून विटेतच टाकून जातात. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना व त्यांच्या लाहनांना काचा लागून अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सदर ठिकाणी स्वच्छ वातावरण असल्याने पहाटेच्या वेळी मॉर्निंगवॉकला जाणाऱ्यांना ही या कारणांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी स्थानिक मच्छिमार सुद्धा रात्री अपरात्री येत असतात त्यांना सुद्धा याठिकाणी फुटलेल्या बाटल्यांच्या काचा लागून अपघात होण्याची शक्यता आहे. तरी शासनाच्या संबंधित बंदर खात्याने या बंदरात येणाऱ्या तळीरामांचा बंदोबस्त करावा अशी मागणी स्थानिक नागरिक व पर्यटकांतून होत आहे.

रस्त्यावरून टेबलावर

जगातले कोणतेही सीमा प्रश्न कधीही उभय पक्षांचे समान किंवा संपूर्ण समाधान करू शकत नाहीत. म्हणूनच ते चिघळत राहतात. जगावर नजर टाकली तर आज किमान दीडशे ठिकाणी सीमांचे विवाद चालले आहेत. भारताला तर याबाबत अनेक शेजाऱ्यांचा कटू अनुभव आहे. अर्थातच, आंतरराष्ट्रीय सीमा विवाद आणि देशांतर्गत सीमा प्रश्न यांच्यात मोठाच गुणात्मक फरक आहे. तरीही, अनेकदा भांडणाऱ्या राज्यांना 'बाबांनो, तुम्ही एकाच देशात आहात. शत्रुराष्ट्रांसारखे परस्परांशी भांडू नका,' असे समजावावे लागते. ईशान्य भारतात अलीकडे दोन राज्यांमध्ये दोनदा जो हिंसाचार झाला, त्यामागे हा सीमा प्रश्नच होता. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पुढाकार घेऊन महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांच्या सरकारांना चर्चेसाठी एका टेबलावर आणणे, याला विशेष महत्त्व आहे. या पुढाकाराचे स्वागत करायला हवे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यातला सीमा विवाद कधी सुटलाच तर तो द्विपक्ष चर्चेतून किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातूनच सुटू शकतो. तोपर्यंत, समंजस शेजारधर्म जसा आवश्यक आहे; तसाच दोन्हीकडच्या मराठी व कन्नड भाषकांना सुखाने जगता आले पाहिजे; हा आग्रहही महत्त्वाचा आहे. त्यांच्यावर कोणतीही भाषिक, सांस्कृतिक दादागिरी होता कामा नये. गृहमंत्री अमित शहा यांच्या पुढाकाराने आता जी दोन्ही राज्यातील प्रत्येकी तीन मंत्र्यांची समिती होणार आहे; तिचे हेच पहिले कर्तव्य असेल. गृहमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांची बैठक सुरळीत झालेली दिसते. छायाचित्रांमधील दोन्हीकडच्या नेत्यांची देहबोली ही मैत्रभावाची नसली तरी समोरासमोर बसून चर्चा करण्याइतपत वातावरण निवळले आहे, हे काही कमी नाही. त्याचे श्रेय केंद्रीय गृह खात्याला आहे. दोन्ही बाजूंनी आणि राज्यांनी या प्रश्नाचे राजकारण करू नये, यावर या चर्चेत एकमत झाल्याचे सांगण्यात येते. इतरही काही सहमतीची कलमे आहेत. मात्र, सीमा प्रश्नाचे राजकारण करण्यातच दोन्ही बाजूच्या अनेकांना रस असतो. कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी सातत्याने आक्रमक विधाने केली; तेव्हा त्यांना त्याच भाषेत उत्तरे देण्याचा आग्रह इथेही होत होता. तसे झाले असते तर त्यातून प्रश्न सुटण्यासाठी कितपत उपयोग झाला असता? कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी 'प्रक्षोभक विधाने होणारे ट्वीटरचे खातेच बनावट होते,' असे म्हणणे ही मोठी माघार आहे आणि आपल्या प्रमादाची अप्रत्यक्ष कबुली आहे. ट्वीटर किंवा इतरही समाज माध्यमे कशी सोयीने वापरली जातात, हे ज्यांना कळते, त्यांना या मानभावी खुलाशाची गंमत वाटेल. मात्र, पुढील चर्चेसाठी वातावरण निवळणे आवश्यक होते. ते काम या खुलाशाने केले. आता दोन्हीकडच्या सहाही मंत्र्यांच्या समितीने हे काम गंभीरपणे घेतले पाहिजे आणि पुढे नेले पाहिजे. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा काही निकाल येत नाही, तोवर प्रत्यक्ष सीमा भागात वातावरण तापविण्यात आणि दैनंदिन जीवन वेठीला धरण्यात काहीच अर्थ नाही. मात्र, दोन्हीकडच्या दोन्ही किंवा कोणतीही भाषा बोलणाऱ्या नागरिकांचा छळ होणार नाही, त्यांना दुय्यम वागणूक मिळणार नाही आणि त्यांच्या पदरात विकासाची फळे ते कोणत्याही राज्यात असले तरी पडतील, याकडे या समितीने कटाक्षाने लक्ष द्यावे. दरवेळी मोर्चे राजकीय फूस लावूनच निघतात, असे नाही. अनेकदा अन्यायामुळे होणारा त्रागाही अनावर होतो. बेळगावसारख्या शहरात मराठी दैनिके, इतर नियतकालिके निघतात. हजारो लोक मराठीत बोलतात. मराठी कार्यक्रम ऐकतात. सारे शहर मराठी आहे. तेव्हा याचा योग्य तो अर्थ कन्नड सत्ताधाऱ्यांनी समजावून घेतला पाहिजे. नुसतीच हडेलहप्पी करू नये. गेले काही दिवस महाराष्ट्र व तेलंगण यांच्या सीमेवरील एकच घर दोन राज्यांत कसे आहे, याचे चित्रण माध्यमांमध्ये फिरत आहे. अशी स्थिती युरोपातही अनेक ठिकाणी आहे. मात्र, प्रत्येक भौगोलिक सीमा ही भाषिक, सांस्कृतिक किंवा कौटुंबिक नात्यांमधील अंतर वाढविणारी ठरता कामा नये. हजारो वर्षे विकसित होणारे, परस्परांमध्ये मिसळून जाणारे, नात्यांनी बांधले जाणारे लोकजीवन एकच कठोर रेष आखून कायमचे विभाजित करता येत नाही, याचे आकलन विशेषत: कर्नाटकाच्या सत्ताधाऱ्यांना होण्याची गरज आहे. सीमा भागातील कायदा व सुव्यवस्थेसाठी विशेष आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक हे यातले स्वागतार्ह पाऊल आहे. आधुनिक तंत्रज्ञान इतके चमत्कार घडविते आहे की, कोणत्याही भाषकाचे भाषास्वातंत्र्य अणुमात्रही आक्रमित होऊ नये. त्यामुळे, भाषेचे शस्त्र करून इतर समूहांचा छळ करणाऱ्यांचे दिवस लवकरच भरणार आहेत. अर्थात, हे चित्र दैनंदिन जीवनात येण्यास अजून वेळ आहे. तोवर कोणताही अन्याय होऊ न देणे आणि झाल्यास तो सहन न करणे आवश्यकच आहे. मंत्रिसमिती झाली, याचा अर्थ महाराष्ट्राने पडती बाजू घेतली, असे कोणी समजू नये आणि राज्य सरकारनेही कुणाचा तसा समज होऊ देता कामा नये.

माथेरानमध्ये शिवसेनेच्या शिंदे गटात इनकमिंग तेजीत

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुका जरी लांबणीवर गेल्या असल्या तरी सुद्धा पक्षप्रवेश मालिका सुरूच असून माथेरान मध्ये सध्यातरी शिवसेनेच्या शिंदे गटात इनकमिंग तेजीत दिसत आहे.बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या शिंदे गटात युवकांची दिवसेंदिवस गर्दी वाढताना दिसत आहे.

प्रत्येक प्रभागातील युवकांनी शिंदे गटाला पसंती देत शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून कोणत्याही प्रकारची अभिलाषा न बाळगता बिनशर्त पक्षप्रवेश करत आहेत. आज दि.१६ रोजी येथील मुस्लिम समाजातील असंख्य युवकांनी शिंदे गटाच्या शिवसेना शाखेत चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते शिव-सेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे. यावेळी उप शहरप्रमुख प्रमोद नायक, माजी नगर-सेवक प्रकाश सुतार, संदीप शिंदे, ज्ञानेश्वर बागडे,अकबर मुजावर, अनिस शेख, अशोक वाघेला, युवा सेनेचे निखिल शिंदे, अनिकेत जाधव, गौरंग वाघेला, खालिद शेख, मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चौधरी, महिला आघाडी युवती सेनेच्या पदाधिकारी उपस्थित होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी तसेच काही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सुध्दा पक्षप्रवेश केला आहे यामध्ये सोहेल महापुळे, अली अजगर डोंगरे, समीर महापुळे, अब्दुल महापुळे, इम्रान महापुळे, अकीब महापुळे, अतिक पटेल, अफाक महापुळे, अतिक वलगे, अन्वर पटेल, राजू पटेल, आरिफ पटेल, आदिल पटेल, आलम मुजावर, जाकीर मुजावर, रियाज मुजावर, शफिक शेख, हमीद महापुळे, रियान मुजावर यांचा समावेश आहे.यावेळी सर्वांचे फटाक्यांची आतिषबाजी करून स्वागत करण्यात आले.

माथेरान मध्ये शिंदे गटात जो काही नवोदित कार्यकर्त्यांचा भरणा वाढत आहे तो चंद्रकांत चौधरी यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून येत आहे त्यांना माहीत आहे की शिंदे गटात गेल्याशिवाय आता गत्यंतर नाही. दरमहा पेन्शन योजना सुरू केली आहे ती अविरतपणे सुरू राहावी जेणेकरून गरजवंतांना याचा पुढेही लाभ घेता येईल. पुढील काळात नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिंदे गटाचा नगराध्यक्ष व्हायला हवा त्यासाठी आपण आताप-ासूनच प्रयत्न केले पाहिजेत असे माजी नगरसेवक प्रकाश सुतार यांनी आपले मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे अनिस शेख, नितेश कदम, निखिल शिंदे यांनी सुध्दा आपले अनमोल विचार यावेळी व्यक्त केले.

माथेरान मध्ये एकूण सात पक्ष कार्यरत आहेत परंतु सद्यस्थितीत शिवसेनेच्या शिंदे गटात पक्षप्रवेशांची मालिका सुरू आहे. अन्य पक्षाच्या नेत्यांनी जोपर्यंत निवडणुका आणि आरक्षण जाहीर होत नाही तोपर्यंत बघ्याची भूमिका घेतली असून त्यासाठीच आपल्या खर्चावर सुध्दा यानिमित्ताने त्यांनी नियंत्रण ठेवले आहे.

माथेरान नगरपरिषद आयोजित सांस्कृतिक गुणदर्शन २०२२ कार्यक्रम

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील शाळा व माजी विद्यार्थ्यांचे एकत्रित सांस्कृतिक गुणदर्शन २०२२ कार्यक्रम शुक्रवार दि.१६ आणि शनिवार दि.१७ रोजी सायंकाळी नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळेत आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये आजी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग असून वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्या मंदिर, प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्या मंदिर आणि सेंट झेव्हियर या तीन शाळांचा सहभाग आहे या कार्यक्रमासाठी अधिक्षक दीक्षांत देशपांडे आणि गव्हाणकर शाळेचे विश्वस्त शशिभूषण गव्हाणकर आणि सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे यांची प्रमुख अतिथी लाभली. या भव्यदिव्य कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण ढेबे, गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील आणि सेंट झेव्हियर स्कुलच्या मुख्याध्यापिका पावलीना यांनी सर्व पालक वर्ग आणि नागरिकांना आमंत्रित केले आहे. सुरू वातीला शाळेच्या विद्यार्थ्यांनी गणेश स्तवन करून कार्यक्रमाला सुरुवात केली त्यानंतर सर्व शिक्षकांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

अदानी इलेक्ट्रिक कंपनीचे समानंतर परवानासाठी अर्ज नाकारावा; महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे निवेदन

दै.रायगड नगरी । पनवेल

तळोजासह नवी मुंबई शहर परिसरात वीज वितरणासाठी अदानी इलेक्ट्रिक कंपनीने समानंतर परवानासाठी अर्ज सादर केलेला आहे. या परवाना अर्जाला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी विरोध दर्शवलाआहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी,अधिकारी, अभियंता संघर्ष समिती ने आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले तसेच याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा अशी विनंती केली.

यावेळी उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगर समन्वयक दिपक घरत, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे कर्मचारी,अधिकारी, अभियंता उपस्थित होते.

तळोजा शहरासह नवी मुंबई क्षेत्रातील महावितरण कंपनीच्या अधिपत्या खालील महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे अदानी इलेक्ट्रिक कंपनीने समानंतर परवानासाठी अर्ज सादर केलेला आहे. परंतु अशा प्रकारचा पहिला प्रयोग सदर ठिकाणी होत असून, सदरबाब जर असा परवाना राज्यात दिला गेला तर, राज्याच्या वीज उद्योगावर त्याचे विपरीत परिणाम होतील. तसेच वीज ग्राहकांना देण्यात येणारा दर हा विशेष करून, शेतीपंप असेल,दरिद्र्य रेषेखालील ग्राहक असेल,सार्वजनिक ठिकाणी असलेले पथदिवे इत्यादींना वीज खरेदीदरापेक्षा कमी दराने वीज देण्यात येते. त्यामुळे सदरचे ग्राहक महावितरण कंपनीकडून खाजगी भांडवलदार यांच्याकडे गेले तर उर्वरित वीज ग्राहकांना वीज दरवाढीचा मोठा फटका बसू शकतो व अशा प्रकारे महावितरण खाजगी उद्योगाकडे गेल्यास महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला मोठा फटका बसू शकतो.

याबाबत महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंता संघर्ष समिती ने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सुद्धा आपल्या भावना राज्यशासनाकडे पोहोचवून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

श्रीवर्धन शहरातील वाहतूक कोंडी सुटता सुटेना, वाहतूक पोलीस श्रीवर्धन शहराच्या प्रवेशद्वारावरच

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

दिवसेंदिवस श्रीवर्धन शहरातील वाहतूक कोंडीची समस्या जटील होत चाललेली आहे. शहरात एकदा वाहतूक कोंडी झाल्यानंतर वाह-तूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस उपलब्ध नसल्याचे दिसून येते. तर स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये अगोदरच पोलिसांचे संख्याबळ कमी असल्यामुळे, असलेली कामे जास्त असल्याने वाहतुकीचे नियमन करण्यासाठी स्थानिक पोलिसांना ही वेळ नसतो. रायगड जिल्ह्यामध्ये पोलिसांची वाहतूक शाखा वेगळी केलेली आहे. या वाहतूक शाखेसाठी पोलिसांचा एक पोलीस निरीक्षक व त्याच्या हाता खाली इतर अधिकारी व पूर्णपणे स्टाफ नेमणूक करण्यात आलेला आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे श्रीवर्धन शहरात मागील अनेक दिवसांपासून केवळ एकच वाहतूक पोलीस कर्तव्यावरती दिसून येतो. शहरात वाहतूक पोलिसांचा धाक नसल्यामुळे दुचाकीस्वार आपल्या दुचाकी वेड्यावाकड्या रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करून ठेवतात. तर अनेक चार चाकी वाहन चालक आपल्या ताब्यातील वाहने रस्त्याच्या बाजूला कोठेही उभी करत असल्याने श्रीवर्धन शहरामध्ये वारंवार वाहतूक कोंडी होत असते. अनेक दुचाकी स्वार गर्दी मधून देखील धूम स्टाईलने दुचाकी चालवताना दिसून येतात. श्रीवर्धन शहरात जवळजवळ ५०% अल्पवयीन मुले दुचाकी चालवताना आढळून येतात. कर्तव्यावर असलेला एकमेव वाहतूक पोलीस केवळ श्रीवर्धन शहराच्या प्रवेशद्वारावरती हेल्मेट नसलेले व वाहन चालक परवाना नसलेल्या दुचाकी स्वारांचे फोटो काढण्यात मग्न असलेला पाहायला मिळतो. तरी जिल्हा वाहतूक शाखेने श्रीवर्धन शहरातील वाहतुकीचे नियमन करण्यासाठी अजून एका पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती करून श्रीवर्धन शहरातील वाहतुकीची जटिल समस्या त्वरित सोडवावी. अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

जाहिर सूचना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र MH46/CC/..../3564 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-6541 चे मालक श्री./श्रीमती सुनिल अशोक धोंडे यांचे तारीख 02/03/22 रोजी निधन झालेले आहे.

मी. श्री/श्रीमती लक्ष्मी अशोक धोंडे पत्ता – न्यु, लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी, आंबेडकर पुतळा मार्ग पनवेल. उपरोक्त लिखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा मला हक्क आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणा-या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

सही/–
लक्ष्मी अशोक धोंडे
न्यु, लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी, आंबेडकर पुतळा मार्ग पनवेल.

जाहिर नोटीस

तमाम सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकत माझे अशिल १) श्री.चंद्रकांत नामदेव पाटील, २) श्री.सुमित चंद्रकांत पाटील, ३) श्री.सुजय चंद्रकांत पाटील माझे अशिलांनी खालील वर्णनाची जमीन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशिलवार वर्णन खालीलप्रमाणे :–

खातेदारांचे नांव	गावाचे नांव	सर्व्हे नं./ हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
काळुबाई महादू सांगडे	मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड	२५२/०	जिरायत ०–५१–४२ पो.ख. ०–०३–४२ एकूण ०–५४–८४ पैकी ०–३८–०० गुंठे विक्री	१.८२

तरी वरील मिळकती बाबत अन्य कोणाचीही विक्री, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणापावती, समजोता करार, भाडेपट्टा, वारसा हक्क, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. अगर समक्ष येवून भेटावे.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकत निर्वे ध व बोजारहीत आहे असे समजून / गृहीत धरुन माझे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व तसेच मागाहून / मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

दि.१६/१२/२०२२

सही/–
ॲड.रश्मी बळीराम जाधव
शॉप नं.०३, यशोकिरण बिल्डींग,
सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
मो.नं.९७७३२६४२००

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रज्वल ध्रुव गायकवाड

जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर साहेब यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८८५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०२/२०२३

श्री.सचिन रामदास डेरे अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.हिरा रामदास डेरे गैरअर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका आहे. सदर निवासी सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : रुम नं.डी–२११, कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं.३५, सेक्टर–११, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, पिन–४१०२१८

मयत श्री.रामदास वामन डेरे यांचे दि.११/०२/२०१२ रोजी मुंबई येथे निधन झाले असून त्यांना श्री.सचिन रामदास डेरे रा.रुम नं.डी–२११, कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं.३५, सेक्टर–११, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, पिन–४१०२१८

सबब अर्जदार हेच मयत श्री.रामदास वामन डेरे यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी मयत श्री.रामदास वामन डेरे यांच्या मृत्यू पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१६/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

ॲड.श्री.एम.एम.मालकर

जाहिर नोटीस

खालापूर येथील मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथम वर्ग यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.३८३/२०२२

१) श्री.महेश बळीराम हिलम (कातकरी)
वय : ३३ वर्षे, धंदा : मोलमजूरी
रा.इसांबे कातकरवाडी, पो.माजगांव,
ता.खालापूर, जि.रायगड
२) भारती नकुल हिलम
लग्नानंतर भारती गोपाळ वाघमारे
वय : ४० वर्षे, धंदा : मोलमजूरी
रा.कुंभिवली कातकरवाडी, पो.खालापूर,
ता.खालापूर, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत इसांबे
ता.खालापूर, जि.रायगड
जन्म–मृत्यू नोंदणी विभाग सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ व २ यांची पणजी कै.किसनी गोपाळ कातकरी (हिलम) ही दि.२०/०६/१९७५ रोजी मौजे : इसांबे अदिवासीवाडी, ता.खालापूर, जि.रायगड येथे त्यांचे राहते घरी निधन पावले आहेत. कै.किसनी गोपाळ कातकरी (हिलम) ही मयत झाल्यानंतर अर्जदार यांचेकडून मयत कै.किसनी गोपाळ कातकरी (हिलम) हिचे मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत इसांबे ता.खालापूर, जि.रायगड यांचे दप्तरी करण्याची राहून गेली आहे. असे अर्जदार यांनी अर्जामध्ये कथन करून व एक वर्षाचे आत मृत्यूनोंद न झाल्याने त्यांचे मृत्यूचे नोंदणीकरिता योग्य त्या न्यायालयाकडून आदेश प्राप्त करणे गरजेचे असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट १९६९ चे कलम १३ (३) अन्वये मृत्यूनोंदीचे आदेश मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणी व्यक्ती इसमास सदरच्या अर्जाकामी हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहून आपली हरकत किंवा लेखी म्हणणे द्यावे अन्यथा वरील मुदतीत कोणतीही हरकत न असल्यास हरकत नाही असे समजले जाईल व अर्जदार यांचे लाभांत त्यांचे मागणी प्रमाणे मृत्यू नोंदीचे आदेश करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

कोर्टाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीने आज दि.१५/१२/२०२२ रोजी दिली.

सही/–
क.लिपीक
फौ.न्याया., खालापूर

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
फौ.न्याया., खालापूर

जाहिर नोटीस

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्री.स्वप्नील राजेंद्र गांधी, सज्ञान, रा.प्रथमेश अपार्टमेंट, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ यांचे नावे स्वकष्टार्जित मालकी अधिकार व हक्काची सदनिका क्र.११, दुसरा मजला, प्रथमेश को.ऑप.हौसिंग सोसायटी, मर्या.पनवेल येथील मालमत्ता क्र.६६५/अ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ मिळकत आहे जिचे तपशिलवार खालीलप्रमाणे :–

''परिशिष्ट''

मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकतीचे वर्णन

अ.क्र.	मिळकतीचे वर्णन	क्षेत्र
१	सदनिका क्र.११, दुसरा मजला, प्रथमेश अपार्टमेंट को.ऑप.हौसिंग सोसायटी, मर्या., मालमत्ता क्र.६६५/अ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६	६७६.०० चौ.फुट (बिल्टअप क्षेत्र)

उपरोक्त सदनिका मिळकत वरील नमूद मालकांची स्वकष्टार्जित मिळकत असून गेली १७ वर्षे निर्विवादपणे ताबेकब्जा व निरंतर वहिवाटीत आहे. त्यानुसार सदर सदनिका मिळकत ही आमचे अशिलांनी आर्थिक मोबदल्याचे बदल्यात कायम खुषखरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, दान, तारण, गहाण, बक्षिस, फरोक्त, अन्न, वस्त्र, दिवाबत्ती, पोटगी, जामिन, वहिवाट, कुळ, विश्वस्त, मुखत्यार, विकसनकरार, बांधकाम करार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसा हक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत खाली सही करणार वकील यांचेकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती व पुरावे न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या उपरोक्त मालकासोबत ''खरेदीचा'' व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदर नोटीसीच्या विरुद्ध वर्तमानत्रातील छापलेल्या जाहिराती, हरकती व सुचना तसेच मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही सुचना व हरकती, माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

दि.१६/१२/२०२२

सही/–
ॲड.श्री.सचिन मा.कल्याणकर
प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला,
मिडलक्लास हौ.सो.लि., युनियन
बँकेच्यावर, गांधी हॉस्पिटलच्या बाजूला,
सुरूची हॉटेल समोर, मुंबई–पुणे हायवे
जवळ, पनवेल, जि.रायगड–४१०२०६
मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१३५

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन,डिझेल इंजिन देखभाल व परिचालन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता इच्छुकांनी अर्ज करावेत

दै.रायगड नगरी । अलिबाग

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सहा महिने मुदतीचे सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन,डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या प्रशिक्षणाच्या दि.०१ जानेवारी २०२३ पासून मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र रायगड-अलिबाग येथे सुरु होणाऱ्या प्रशिक्षण सत्रासाठी रायगड जिल्ह्यातील युवकांकडून दि.३१ डिसेंबर २०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे. या प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण केंद्राच्या ५७ फूट लांबी असलेल्या ६३.३५ टनेज क्षमतेच्या सिलेंडर संख्या ६ व २०५ अश्वशक्तीचे इंजिन असलेल्या मत्स्यप्रबोधिनी या प्रशिक्षण नौकेद्वारे सागरी सफरीवर नेऊन प्रात्यक्षिक व सिध्दांतिक ज्ञान दिले जाणार आहे.

पारंपारिक मच्छिमारांचा ऐतिहासिक विजय

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील जेएनपीटी, ओएनजीसी, सिडको, एनएमईएसईझेड या कंपन्यांनी मासेमारी जमिनीवर भराव करून त्या जमिनी भाडेतत्त्वावर देऊन अनेक प्रकल्प तयार करून करोडो रुपये कमावत आहेत.

माहुल क्रिक ॲक्ट १९२२ नुसार ब्रिटिश सरकारने माहुल जेटि तयार करतेवेळी तेथील मच्छिमारांना नुकसानभरपाई दिलेली आहे. त्या आधारे उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा, उरण कोळीवाडा, गव्हाण कोळीवाडा व बेलपाडा कोळीवाडा गावातील पारंपारिक मच्छिमारांच्या मूलभूत हक्कासाठी व मासेमारी जमिनीचीमच्छिमारांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी हनुमान कोळीवाडा गावातील रमेश भास्कर कोळी, उरण कोळीवाडा गावातील रामदास जनार्दन कोळी व दिलीप पांडुरंग कोळी

व इतर यांनी पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समितीची स्थापना करून जेएनपीटी, ओएनजीसी, सिडको, एनएमएसईझेड या कंपन्यांच्या विरुद्ध लढा उभा केला.

पारंपारिक मच्छिमारांच्या संविधानाने दिलेल्या न्याय हक्कासाठी मा. मानवी हक्क आयोग, मा. छ्रद्ध कोर्ट पुणे यांच्याकडे दाद मागून विजय मिळविला. मा. छ्रद्ध कोर्ट पुणे यांनी भारतीय कुल वहिवाट कायदा १८८२ नुसार पारंपारिक मच्छिमार मासेमारी जमिनीचे मालक आहेत. आणि त्या मासेमारी धंद्याच्या हानीचि मागील तीन वर्षाची (सन २०१२ ते २०१४) नुकसानभरपाई तीन महिन्याच्या मुदतीत व मासेमारी जमीन पूर्ववत करण्याचा २७. ०२.२०१५ रोजी ऐतिहासिक निर्णय दिला होता. मा. NGT कोर्ट पुणे यांनी दिलेल्या आदेशाच्या विरुद्ध जेएनपीटीने पुनरावलोकन याचिका दाखल केली होती. ती मा. NGT कोर्टाने फेटाळून लावली. म्हणुन जेएनपीटीने मे २०१५ रोजी सुप्रीम कोर्टात अपील केला.

मा. छ्रद्ध कोर्टाने मासेमारी जमीन पूर्ववत करण्याचा आदेश दिलेला असूनही त्याच जमिनीत जेएनपीटी ने एक्स्टेंशन ३३० कंटेनर टर्मिनल, एक्स्टेंशन पोर्ट बर्थ टर्मिनल, एक्स्टेंशन चौथे कंटेनर टर्मिनल, लिक्विड कार्गो बर्थ वगैरे वगैरे प्रकल्प तयार केले व करत आहेत. मा. NGT (एनजीटी)ने त्या मासेमारी जमिनीचि तपासणी करण्यासाठी कमीटि पाठविली होती. त्या कमीटिने मा. एनजीटी कोर्टाला जेएनपीटी च्या एक्स्टेंशन प्रकल्पामुळे मासेमारी जमिनीवर गंभीर परिणाम झाल्याचे कळविले आहे. त्यामुळे

जेएनपीटी ने सात वर्षानंतर केलेल्या गुन्हे व मच्छिमारांच्या शोषनेच्या जाणिवेतून मा. सुप्रीम कोर्टात केलेला अपील मागे घेतलेला आहे. त्यामुळे हनुमान कोळीवाडा, उरण कोळीवाडा, गव्हाण कोळीवाडा व बेलपाडा कोळीवाडा गा-वातील पारंपारिक मच्छिमारांचा हा ऐतिहासिक विजय झालेला आहे.पारंपारिक मच्छिमार बचाव सामाजिक कृती समितीच्या पाठपुराव्याला यश आले असून पाठपुरावा केलेल्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे सर्व मच्छिमार बांधवांनी, नागरिकांनी अभिनंदन व्यक्त करत आभार मानले आहेत.

कर्जतच्या कु.वैष्णवी गंगावणे कुस्तीच्या क्षेत्रात चमक

दै.रायगड नगरी । कर्जत

रायगड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद कामगिरी कर्जतच्या कु. वैष्णवी गणेश गंगावणे हिने कुस्तीच्या क्षितिजावर आपली चमक दाखवली आहे.

दि. १५ डिसेंबर २०२२ रोजी इसांबा फाटा टाटा कॉलनी खालापूर येथे पार पडलेल्या क्रीडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, विभागीय शालेय (शासकीय) कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत १७ वर्षे मुली वजन ६१ किलो या गटात विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेत संजय हेगडे स्पोर्ट्स अँकाडमी येथे प्रशिक्षण घेत असलेली व शारदा मंदिर कर्जत (इंग्रजी माध्यमची) विद्यार्थीनी कु.वैष्णवी गणेश गंगावणे हीने मुंबई विभागस्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिची आता शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती छाया नगरकर, कोच रमेश लोभी, माणिक पाटील, संजय देशमुख व धनश्री कानडे शिक्षकवृंद यांचे विषेश मार्गदर्शन तिला लाभले आहे.या यशाबद्दल तिचे वडील गणेश गंगावणे, आई सुरेखा गंगावणे यांनी तिचे विशेष कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

विशेष म्हणजे गणेश गंगावणे प्राथमिक शिक्षक शाळा स्टेशन ठाकुरवाडी यांची ती कन्या आहे. या यशाबद्दल कु. वैष्णवी गणेश गंगावणे हीचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

आज श्रीवर्धनची ग्रामदेवता सोमजाई देवीचा रथोत्सव

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

श्रीवर्धनची ग्रामदेवता सोमजाई देवीचा वार्षिक रथोत्सव अतिशय पारंपारिक पद्धतीने व उत्साहाने आज साजरा करण्यात येणार आहे. श्रीवर्धनची सोमजाई माता ज्याप्रमाणे श्रीवर्धनची ग्रामदेवता आहे, त्याचप्रमाणे अनेक कुलांची कुलस्वामिनी देखील आहे. सोमजाई देवीचे मंदिर हे स्वयंभू असून भवानीतीर्थ नावाने देखील ओळखले जाते. एकाच दिवशी भवानी तीर्थ म्हणजेच सोमजाई, हरिहरेश्वर व काळभैरव यांचे दर्शन घेतले असता दक्षिणकाशीचे पुण्य प्राप्त होते असे बोलले जाते.

सोमजाई देवीच्या रथोत्सवास मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा या दिवशी सुरुवात होते. सात दिवस सतत अखंड भजन पहारा सुरू असतो. आठव्या दिवशी दहीकाला होऊन दुपारी संपूर्ण गावसईला महाप्रस-ादाचे आयोजन करण्यात येते. श्रीवर्धन येथील ग्रामदेवता सोमजाई देवीची स्थापना अगस्ती मुलींनी केल्याचे सांगितले जाते. सोमजाई माता शिवभवानी, शाळीग्राम रुपी अर्धनारी नटेश्वर स्वरूपात आहे. चतु: सीमेवरती शिवशक्ती, कंकाळी, भद्रकाली, कात्यायनी, चामुंडायनी इत्यादी देवता आहेत. तर मुख्य देवता सोमजाई शिवभवानी, नंदी, वासुकी ही शाळीग्राम स्वरूपामध्ये आहे. सोमजाई देवीच्या मंदिरामध्ये नित्यनेमाने सकाळी सात वाजता व सायंकाळी सात वाजता आरती करण्यात येते. यावेळी शहरातील असंख्य नागरिक आरतीसाठी उपस्थित असतात. रथोत्सवाच्या दरम्यान सात दिवस कसबा भंडारी समाज, सोनार समाज, वाणी समाज व नवी पेठ भंडारी समाज यांचा अखंड भजन सप्ताह सुरू असतो. सोमजाई देवीच्या मंदिरामध्ये आज तागायत कौल लावण्याची प्रथा अस्तित्वात आहे. अनेक नागरिक आपल्यावरती आलेली विविध संकटे किंवा समस्यांवरती देवीच्या मंदिरात येऊन कौल लावत असतात.

सोमजाई देवस्थान हे जागृत देवस्थान असल्यामुळे नागरिकांनी लावलेल्या कौलाला योग्य प्रकारे उत्तर देवीकडून मिळते अशी श्रद्धा आहे. पूर्वी साथीच्या रोगांच्या साथी येऊन गावेच्या गावे रोगांमध्ये मृत्युमुखी पडत असत. १७९९ साली श्रीवर्धन शहरात देखील प्लेगची साथ आली होती. यावेळी श्रीवर्धनच्या नागरिकांनी देवीला प्लेग पासून मुक्ती मिळावी यासाठी साकडे घातले होते. तेव्हापासून आजपर्यंत सोमजाई देवीची रथयात्रा नित्यनियमाने सुरू आहे. रात्री बारा वाजता सोमजाई मंदिरातून रथयात्रा निघते, ती कसबा पेठ, सोनार आळी, वाणी आळी,मेटकर्णी, नवी पेठ,कुंभार आळी, कसबा पेठ, टिळक मार्ग या ठिकाणी फिरून दुपारी बारा वाजता पुन्हा मंदिरामध्ये रथयात्रेचा समारोप करण्यात येतो. सोमजाई देवीच्या रथयात्रेसाठी महाराष्ट्रभरातून तसेच मुंबई, पुण्यासारख्या शहरातून अनेक भाविक आवर्जून उपस्थित असतात.

CHANGE OF NAME

My old Name was **Rohit Balkrishna Dudwadkar** As per Gazzete No. (X-57076), I will be known as **Rohit Balkrishna Dudhwadkar (New Name)** R/at : Channel Star Chs D Wing Room No 302 Plot No 15 Sector No 16 Kamothe Navi Mumbai 410209

Rohit Balkrishna Dudhwadkar
(Sd/- New Name)

मा.सोनवलकर साो.कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.गुरुनाथ डी. भगत

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साो.वर्ग १ यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१२६५/२०२२
नि.नं.७
ने.ता.१८/०१/२०२३

श्री.धनाजी सुखदेव मोटे, वय : ४६ वर्षे
धंदा : नोकरी, रा.एल.आय.जी.२,
रुम नं.जी-७४, से.२ ई, कळंबोली,
पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८
मो.नं.८४३३५६३४७५ अर्जदार

विरुद्ध

निबंधक जन्म मृत्यू नोंदणी
कळंबोली विभाग
महानगरपालिका, पनवेल
कळंबोली, पो.कळंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन-४१०२१८ सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी त्यांचे मुलाचा कुमार यश धनाजी मोटे, जन्म दि.२९/०६/२०१९ रोजी मुक्काम कळंबोली, एल.आय.जी.२, रुम नं.जी-७४, से.२ ई, कळंबोली, पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, पिन-४१०२१८ येथे राहत्या घरी झालेला असल्याकारणाने जन्म नोंदीचा आदेश मिळण्यासाठी अर्जदार यांनी या न्यायालयात फौ.चौ. अर्ज नं.अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदरील जन्माच्या तारखेच्या बाबतीत कोणासही कसलीही हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात पुराव्यांसहीत हरकत दाखल करावयाची आहे. सदर काळात कोणाचीही हरकत न आल्यास सदर न्यायालय अर्जदारांच्या लाभात योग्य तो आदेश जारी करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया., पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया., पनवेल

मा.सोनावणे साो
अर्जदाराचे वकील : ॲड.विजया रा. म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय
दि.चौ.अर्ज क्र.१८२४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०१/२०२३

१) श्री.हिरामण कान्हा उर्फ काना भोईर
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्री.राम कान्हा उर्फ काना भोईर
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : शेती
३) सौ.मिनाक्षी शंकर पाटील पुर्वाश्रमीचे
नाव मिनाक्षी कान्हा उर्फ काना भोईर
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार क्रं.१ ते ३ सर्व रा.कोपर (कोल्ही),
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, अर्जदार यांचे वडील कै.कान्हा उर्फ काना काथोर भोईर हे दि.०८/०३/२०१८ रोजी मु.कोपर-कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीची ह्या सरकारतर्फे सिडकोने ''नव्या मुंबई'' योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे : पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड

मौजे/युनिट केस	सर्वे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
पारगांव/१६४	५०	१	०-०१-०	---

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.कान्हा उर्फ काना काथोर भोईर यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्टात अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१४ माहे १२ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.सोनावणे साो
ॲड.अनिरुद्ध गो. तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८०४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०१/२०२३

१) श्रीमती.प्रभा विश्वास दिक्षित
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.राहुल विश्वास दिक्षित
वय : ४२ वर्षे, धंदा :
क्रं.१ व २ रा.माऊली दर्शन को.ऑप.हौ.सोसायटी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.स्नेहा तुषार कापरे
वय : ३४ वर्षे, धंदा :
रा.फ्लॅट नं.३०४, सागरदिप सोसायटी,
जुना ठाणा नाका रोड, गव्हर्नमेंट कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ व ३ यांचे वडील कै.विश्वास काशिनाथ दिक्षित यांचे दि.१२/०९/२०२२ रोजी देहावसान झाले आहे. कै.विश्वास काशिनाथ दिक्षित यांची आई शारदा काशिनाथ दिक्षित यांचे देखील दि.०२/०५/१९७६ रोजी देहावसान झाले आहे. कै. विश्वास काशिनाथ दिक्षित यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार क्रं.१ ही विधवा पत्नी व अर्जदार क्रं.२ व ३ ही अपत्ये असे कायदेशीर वारस आहेत.

कै.विश्वास काशिनाथ दिक्षित यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सिटी सर्व्हे क्रं.६६५ पैकी वर बांधण्यात आलेल्या माऊली दर्शन को.ऑप.हौ.सोसायटी या इमारतीचे डी विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.६, क्षेत्र ७२८ चौरस फुट बिल्टअप अशा वर्णनाची निवासी सदनिका.

वर श्रीमती.प्रभा विश्वास दिक्षित वगैरे हे कै.विश्वास काशिनाथ दिक्षित यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.प्रभा विश्वास दिक्षित वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर श्रीमती.प्रभा विश्वास दिक्षित यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१६/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.गोडसे साो
अर्जदाराचे वकील : ॲड.विजया म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय
दि.चौ.अर्ज क्र.१८२३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०१/२०२३

१) श्रीमती.संध्या दत्तात्रेय ठाकूर
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.रोहित दत्तात्रेय ठाकूर
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.संदेश दत्तात्रेय ठाकूर
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्रं.१ ते ३ सर्व रा.जासई,
ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, वरील कै.दत्तात्रेय जनार्दन ठाकूर हे दि.२३/११/२०२० रोजी मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीची ह्या सरकारतर्फे सिडकोने ''नव्या मुंबई'' योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

अ) मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड

अ. क्र.	मौजे/युनिट केस	सर्वे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	जासई-११/९०	१०३	१०	०.९७.०० पो.ख. ०.०७.००	३.१२
२	जासई-४/२००६	७७	१	०.१०.२० पो.ख. ०.०४.५०	०.२२
		७८	३ पैकी	०.२४.९० पो.ख. ०.०३.००	०.५७
		७६	१ अ पैकी	०.०४.२० पो.ख. ०.०१.८०	०.९१
		७९	२ पैकी	०.३६.४० पो.ख. ०.१२.००	५.४९
३	जासई एस.आर. नं.१/२०१९	७८	३	०.०८.१०	---

ब) मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड

अ. क्र.	मौजे/युनिट केस	सर्वे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	गव्हाण	३१६	---	०.४४.३० पो.ख. ०.०५.८०	५.६२

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.दत्तात्रेय जनार्दन ठाकूर यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत टन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१४ माहे १२ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२४४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२४/०१/२०२३

सौ.उज्वला गणेश म्हात्रे व इतर अर्जदार

विरुद्ध

श्री.विकास वामन ठाकूर व इतर सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.वामन सिताराम ठाकूर राहणार मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड हे अल्पशा आजाराने दि.०७/१०/२००३ रोजी जसखार येथे राहत्या घरी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार यांची आई कै. पुष्पलता महेश म्हात्रे यांचे दि.२९/०१/२००० रोजी मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले आहे. अर्जदार क्रं.१) सौ.उज्वला गणेश म्हात्रे रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड २)सौ. दिप्ती किशोर कांबळे रा.केगाव, ता.उरण, जि.रायगड ३) सौ.कामिनी निलेश घरत रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड ४) सौ.विशाखा महेश लायगुडे रा.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड, ५) सौ.मेघा महेश म्हात्रे रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
४४९/९४/जसखार	२२०	२७	०-०२-०८
४४९/जसखार	१५	२	०-०५-०८
	३७	१	०-०८-०५
	९४	२	०-०९-०९
	१२०	७ A	०-०३-०३
	११३	१६	०-०५-०८
३६७/जसखार	२४	२	०-०५-०८
	१२९	१८	०-०४-००
	१४७	१०	०-०५-०६
	१४३	११	०-०६-०७
	१९९	५ (१)	०-०९-००
३६७/जसखार	२८८	६	०-०३-००
	२७	१ (A)	०-०६-०८
	४७	६	०-०७-०९
	८८	३	०-०८-०७
	९९	६	०-०७-०७
	१०३	२	०-०२-०३
	१२१	१८ (A)	०-०३-०८
	१३२	३२ (B)	०-०१-०५
	१८७	१ (१)	०-०६-०६
	२२२	७	०-०६-०६

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वरस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जणार नाहीत याची नोंद घ्यावी.

उरण
दि.७/१२/२०२२

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

संक्षिप्त...

ट्रेलर व मोटार सायकलच्या अपघातात एक जण जखमी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल जवळील राष्टीय महामार्ग ३४८ वरती पोल क्रं १७ जवळ नांदगाव गावाच्या हद्दीत ट्रेलर व मोटारसायकलमध्ये झालेल्या अपघातात मोटार सायकल स्वार जखमी झाल्याची घटना घडली आहे. प्रशांत मुकादम यांच्या ताब्यातील मोटार सायकल वरून राष्टीय महामार्ग ३४८ वरती पोल क्रं १७ जवळ चालले असताना पाठीमागून अज्ञात ट्रेलरवरील चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने अविचाराने व भरधाव वेगाने त्यांना धडक दिली. यामध्ये ते जखमी झाले असून मोटार सायकलीचे सुद्धा नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ओला व सुक्या कचऱ्याच्या दोन पेट्या पनवेल गुन्हे शाखेला आल्या देण्यात

दै.रायगड नगरी । पनवेल

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष मा नगरसेवक तथा भाजपा शहर सरचिटणीस नितीन जयराम पाटील यांच्या तर्फे पनवेल गुन्हे शाखा, युनिट २ येथे ओला व सुक्या कचऱ्याच्या दोन पेट्या देण्यात आल्या. यावेळी वरीष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील साहेब, पोलीस अजित पाटील यांच्या उपस्थितीत भेट देण्यात आल्या. यावेळी भाजपा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, मंगेश चंदने, महेश सरदेसाई, विजय डिसोझा, केतन खुटले उपस्थित होते.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

कशेळे येथील राजेंद्र ज्वेलर्स व्यवसायिक याचे खुनाचा उलघडा

दै.रायगड नगरी । अलिबाग

कशेळे येथील राजेंद्र ज्वेलर्स व्यवसायिक हरिष उर्फ हरिसिंग माधोसिंग राजपुत, वय-३८ वर्षे, रा.ठाकुर्ली, कल्याण, जि.ठाणे हे नेहमी त्यांचा सायंकाळचे वेळस दुकान बंद करून कशेळे येथून नेरळ रेल्वे स्टेशन येथे त्यांची मोटर सायकल लावून रेल्वेने ठाकुर्ली येथे त्यांचे घरी जात असे. दि.०३/१२/२०२२ रोजी हरिष राजपुत हे घरी वेळेत न पोहोचल्याने त्यांची पत्नी व नातेवाईक नेरळ पोलीस ठाण्यात माहीती देण्यास आल्यानंतर नेरळ पोलीसांनी रात्रीचे वेळी नेरळ-कशेळे रस्त्यावर शोध घेत असताना मौजे जिते गावचे हद्दीत रस्त्याचे बाजूला गवतामध्ये एक बजाज डिस्कव्हर मोटर सायकल पडलेली दिसून आल्याने पोलीसांनी जवळ जावून पाहीले असता ज्वेलर्स व्यवसायिक हरिष राजपुत हे मयत अवस्थेत शेतामध्ये पडलेले मिळून आले व त्यांचे पोटावर, छातीवर, मानेवर, डावे पायावर व हातावर धारदार हत्याराने वार करून जिवेठार मारल्याचे दिसून आले म्हणून सदरबाबत नेरळ पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३५९/२०२२ भादंविसं कलम ३०२ प्रमाणे दि.०४/१२/२०२२ रोजी ०९.२७ वा.गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे घटनास्थळी मा.पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे सो.रायगड, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.अतुल झेंडे सो, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विजय लगारे, कर्जत विभाग यांनी भेट देवून गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून गुन्हा उघडकीस आणण्याकरीता वेगवेगळे ४ पथके तयार करून त्यांना मार्गदर्शन केले असता स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.दयानंद गावडे व त्यांचे पथक यांनी तांत्रिकदृष्टया, सी.डी.आर.चे अवलोकन, सी.सी.टि.व्ही.फुटेजच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून ३६ तासाचे आत आरोपी नामे १)जनार्दन विठ्ठल कराळे, २) रोशन लक्ष्मण धुळे, दोन्ही रा.मु.सावळे, पो.मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने सखोल चैकशी केली असता त्यांनी व त्यांचे विरार येथील ४ साथीदार यांच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना दि.०७/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आलेली आहे. त्यानंतर नेरळ पोलीस ठाण्याचे डी.बी.पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री.श्रीकांत काळे व त्यांचे पथक यांनी विरार येथे राहणारे गुन्हयातील आरोपी नामे ३) सनी मनमोहन गिरी, ४) सुरज दिपक जाधव, ५) तानाजी बाबुराव चैगुले यांना शिताफीने विरार येथे ताब्यात घेवून त्यांना दि.०९/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांचा साथीदार छगनाराम भिमारामजी पटेल, रा.सोलापूर हा सोलापूर येथे असल्याची माहीती मिळताच नमुद आरोपी यास नेरळ पोलीस ठाण्यातील सहा.फौजदार गिरी, पोहवा/२०२७ म्हात्रे, पोशि/१९२६ बारगजे यांनी सोलापूर येथून ताब्यात घेवून नेरळ पोलीस ठाणे येथे आणल्यानंतर त्यास दि.१४/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे उघडकीस नसलेला आव्हानात्मक गंभीर गुन्हयाचा तांत्रिकदृष्टया जलद गतीने तपास करून गुन्हयातील सर्व ६ आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे गुन्हयातील मयत व्यक्तीची बॅग, मोबाईल फोन, आरोपी यांनी गुन्हा करतेवेळी वापरलेली स्कुटी व काळया रंगाची झायलो कार असे वाहन जप्त करण्यात आलेले असून सदरचा गुन्हा कट रचून खुनासह दरोडा असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने गुन्हयात भादंविसं कलम ३९६,१२०ब हे कलम लावण्यात आलेली असून गुन्हयाचा पुढील तपास नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र तेंडुलकर हे करीत आहेत.

तरी अशाप्रकारे गंभीर गुन्हयाचा पोलीसांनी ३६ तासात छडा लावणेकामी मा.पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे सो.रायगड, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.अतुल झेंडे सो, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विजय लगारे, कर्जत विभाग यांचे मार्गदर्षनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, रायगड अलिबागचे पोलीस निरीक्षक श्री.दयानंद गावडे, पो.निरी. राजेंद्र तेंडूलकर, सपोनि. श्री.नागेश कदम, पो.उप.निरी. महेश कदम, श्रीकांत काळे, स्थागुअ.शाखे कडील सहा.फौज. दिपक मोरे, पोहवा. राजेश पाटील, यशवंत झेमसे, अमोल हंबीर, प्रतीक सावंत, प्रशांत दबडे, राकेश म्हात्रे तसेच नेरळ पोलीस ठाणे कडील सहा.फौज.गणेश गिरी, पो-हवा.शकद फरांदे, निलेश वाणी, पो.ना. घनशाम पालवे, भाउ आघाण नेरळ पोलीस ठाणे तसेच अक्षय पाटील सायबरसेल यांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

तरी सदरचा गुन्हा हा सावळे येथील स्थानिक राहणारे आरोपी नामे जनार्दन विठ्ठल कराळे, रोशन लक्ष्मण धुळे यांनी कशेळे येथील राजेंद्र ज्वेलर्स दुकान लुटण्याचे उद्देशाने सोलापूर येथील राहणारा आरोपी छगनाराम भिमारामजी पटेल याला टिप देवून त्याचे विरार येथील साथीदार आरोपी नामे सनी मनमोहन गिरी, सुरज दिपक जाधव, तानाजी बाबुराव चौगुले साथीदार यांचेसह गुन्हेगारी कट रचून सदरचा गुन्हा केलेला आहे.

केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब दानवे यांना निवेदन

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्या थांबत नसल्याने कर्जत तालुक्यातील तसेच आजूबाजूच्या तालुक्यातील प्रवाशांची गैरसोय होते. विद्यार्थी, चाकरमानी आदी प्रवाशांची खूप गैरसोय होते. या गाड्या थांबव्यात म्हणून भाजपा किसान सेल कोंकण समन्वयक सुनील गोगटे यांनी दिल्ली येथे केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब दानवे भेट घेऊन कर्जत रेल्वे स्थानकात मधील समस्यांबद्दल निवेदन दिले व चर्चा केली.

सुनील गोगटे यांनी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेतली. पुण्याहून मुंबई कडे जाणाऱ्या मेल एक्सप्रेस करोना काळापूर्वी कर्जत येथे थांबत होत्या परंतु सुरक्षा कारणाने कर्जतला थांबायच्या बंद झाल्या आहेत,परंतु आता परिस्थिती सामान्य आहे. त्यामुळे पुर्वी कर्जतला थांबणाऱ्या ट्रेन पुन्हा थांबवाव्यात अशी मागणी प्रवाश्यांचा वतीने निवेदनाद्वारे केली तसेच कर्जत पनवेल रेल्वे आणि कोषाणे यार्डसाठी शेतकऱ्यांची जमीन भूसंपादन होत आहे त्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला जात नाही. अधिकारी अडवणूक करतात त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला लवकरात लवकर मिळावा असे निवेदनात नमूद केले आहे.

रेल्वे प्रवासात दोन मोबाईलची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

रेल्वे प्रवासादरम्यान प्रवाश्यांकडील दोन महागड्या मोबाईलची चोरी झाल्याची घटना घडल्याने प्रवासी वर्गामध्ये भीतीयुक्त वातावरण आहे.

हार्बर मार्गावरील लोकल मधून प्रवास करणाऱ्या हर्षल पाठक यांचा २७ हजार रुपये किमतीचे चोरून नेण्यात आला आहे. याबाबतची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे तर स्मिता कदम यांचाही मोबाईल महिला डब्यातून प्रवास दरम्यान चोरून नेण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या चोरीच्या घटनांमुळे प्रवासी वर्गामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

माथेरानमध्ये मीरा फाऊंडेशनच्या वतीने गरजवंतांना पेन्शनचा मासिक दहावा हप्ता

दै.रायगड नगरी । माथेरान

बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या शिंदे गटाचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या माध्यमातून मीरा फाउंडेशनच्या वतीने विधवा, अपंग तसेच निराधार लोकांना दरमहा एकहजार रुपयांचा दहावा मासिक हप्ता आज दि.१६ रोजी शिवसेना शाखेत देण्यात आला यावेळी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चौधरी,उप शहरप्रमुख प्रमोद नायक, माजी नगरसेवक संदिप शिंदे, प्रकाश सुतार,रवींद्र बिरामणे,जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे,युवा सेनेचे निखिल शिंदे,गौरंग वाघेला,अशोक वाघेला, अनिकेत जाधव, अकबर मुजावर, अनिस शेख,खालिद शेख, मयूर चौधरी यांसह महिला आघाडीच्या सदस्या, युवती सेनेच्या पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

मागील वर्षी आपल्या तालुक्याचे कार्यसम्राट आमदार मा महेंद्र थोरवे साहेब यांच्या शुभ हस्ते या योजनेचा शुभारंभ झाला. १६ डिसेंबर २०२१ ते आज १६ डिसेंम्बर २०२२ पर्यंत या योजनेचे एकूण १३ हप्ते होतात. पतसंस्थेच्या आचारसंहितेचे ३ हप्ते सोडल्यास उर्वरीत १० हप्ते १,४३,०००/- प्रमाणे १४ लाख आपल्या मिळकतीतून गोरगरीब , गरजू, विधवा महिला, व जेष्ठ नागरिकांना पेन्शन स्वरूपात कोणताही खंड पडू न देता वाटप करणे हे चंद्रकांत चौधरी यांच्या हातून घडलेले अद्वितीय सत्कर्म आहे. यातून आपल्याला कोणताही राजकीय फायदा होईल याची त्यांनी कधीही तमा बाळगली नाही म्हणून आजच्या वर्षपूर्ती निमित्ताने चंद्रकांत चौधरी यांचं कौतुक करू तेवढ कमीच आहे. समाजसेवेचे हे व्रत जोपासण्यासाठी त्यांना त्यांच्या व्यवसायात, राजकिय क्षेत्रात उंच भरारी घेणेस बळ देवो हीच सदिच्छा.

योगेश जाधव, अध्यक्ष वनव्यवस्थापन समिती माथेरान

माथेरान मधील काही कुटुंबातील सदस्यांना आजही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेकांची घरची परिस्थिती हलाखीची असून दिव्यांग, निराधार त्याचप्रमाणे विधवा महिलांना दर महिन्याला एकहजार रुपयांचा आधार देण्यासाठी आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. दर महिन्याला १४३ गरजवंतांना याचा लाभ होत आहे.

देव देवळात नसून तो आम्ही माणसात पहात आहोत ही सदभावना ठेऊन काहीही अभिलाषा न बाळगता मदत करण्यासाठी निःपक्षपणे छोटासा प्रयत्न करत आहोत असे चंद्रकांत चौधरी यांनी यावेळी सांगितले.

आपण ज्या समाजात राहतो वावरतो ,घडतो त्या आचार विचारांचा प्रभाव आपल्यावर होत असतो व त्याची प्रतिकृती म्हणजेच कार्यसम्राट श्री चंद्रकांत चौधरीजी यांचे असेच उत्तम कार्य अविरत राहो व त्यांच्या कार्याची प्रेरणा,आणि दानशीलता इतरानीही घ्यावी.

संतोष आखाडे, सामाजिक कार्यकर्ते माथेरान

पाली बस स्थानक समस्यांच्या गर्तेत

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पालीतील बसस्थानकाचे नूतनीकरण मंजुरी येऊनदेखील मागील तीन वर्षांपासून ठप्प आहे. तसेच स्थानकाला खड्डे, डेब्रिज, उघडा नाला, दुर्गंधी आदी विविध समस्यांनी वेढले आहे. परिणामी, येथील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे.

दीड वर्षांपूर्वी पाली बस स्थानकाची जुनी धोकादायक इमारत तोडण्यात आली आहे. त्यावेळी स्थानक आवारात तात्पुरत्या स्वरूपाची निवारा शेड व स्वच्छतागृह बांधण्यात आले. निवारा शेड छोटे असल्यामुळे प्रवाशांना बसण्यासाठी अडचण होते. मात्र, त्यानंतर आजतागायत परिवहन महामंडळ अथवा कंत्राटदाराकडून तेथे कोणत्याही स्वरूपाचे काम सुरू करण्यात आलेले नाही. जुन्या इमारतीचे डेब्रिज व राडारोडा स्थानकात तसाच पडला आहे. स्थानकातील नाल्याचा स्लॅब तुटलेला आहे. त्यामुळे गाड्या ये-जा करण्यास अडथळा येतो. स्थानक आवारात पालीतील नाले व गटारांतील सांडपाणी येते. त्यामुळे येथे खूप दुर्गंधी पसरली आहे. स्थानकात मोठाले खड्डे पडले आहेत. प्रवाश्यांना पिण्यासाठी चांगले पाणी देखील नाही. अशा प्रकारे पाली बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे. यामुळे स्थानिक नागरिक व प्रवाशांमध्ये प्रचंड संताप आहे.

यावेळी रवींद्रनाथ ओव्हाळ म्हणाले की, स्थानकाचे नूतनीकरण व येथील समस्या मार्गी लावण्यासाठी अनेकदा उपोषण केले आहे. काही महिन्यांपूर्वी परिवहन मंडळाच्या कार्यकारी अभियंत्या व परिवहन महामंडळ विभाग नियंत्रक रायगड आणि इतर अधिकारी स्थानकातील परिस्थिती पाहून गेले आहेत. मात्र त्यानंतर कोणतीही उपाययोजना व ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे या प्रश्नांवर पुन्हा उपोषणाला बसणार आहे.

यावेळी बोलताना विद्या भिलारकर म्हणाल्या की, हे काम करणाऱ्या ठेकेदाराचे कंत्राट रद्द करण्यात आले असून, त्याला काळ्या यादीत टाकले आहे. १५ दिवसांत नव्याने निविदा बोलावणे व नवीन ठेकेदार नेमण्याची आणि स्थानक नूतनीकरणाची कार्यवाही करण्यात येईल. शिवाय मंजूर निधीच्या अनुषंगाने स्थानकाचा नवीन आराखडा देखील बनविण्यात येईल. स्थानक आवारातील तोडलेल्या नाल्याच्या स्लॅब बाबत पाली नगरपंचायतीकडे पाठपुरावा करून नगरपंचायतीकडून हे काम करून घेण्यात येईल.

नवीन बसस्थानक नूतनीकरणासाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर झाला होता. यामध्ये नवीन सुसज्ज भव्य इमारतीसह विविध सुविधा आदींचा समावेश होता. तसेच इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामास जानेवारी २०२० पासून सुरुवात होणार होती. मात्र नवीन इमारतीची अजून एक वीट सुद्धा बसविण्यात आलेली नाही.

पनवेल महानगरपालिका

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जाहीर आवाहन

आरोग्य आणि स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून स्वच्छ आणि सुरक्षित शौचालये सर्वांसाठी आवश्यक आहेत. स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून भारताने संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दीष्टांतर्गत निर्धारित केलेल्या उद्दीष्टांच्या अगोदरच स्वच्छता वर्षापर्यंत पोहोचण्याचे लक्ष गाठले आहे. हे यश शाश्वत ठेवण्याच्या दृष्टीकोनातून केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी व्यवहार मंत्रालयाद्वारे दि.१९ नोव्हेंबर २०२२ रोजी सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालये सुधारण्यासाठी ''शौचालय २.०'' (Toilet 2.0) मोहिम राबविण्यास प्रारंभ केला आहे.

''शौचालय २.०'' मोहिमेचा मुख्य उद्देश तेथील सुविधांची सुधारित देखभाल जागरुकता निर्माण करणे आणि नागरिकांच्या सहभागातून शहरी भागातील सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालये सुधारणे हा आहे. सदर मोहिमे अंतर्गत पनवेल महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांसाठी सर्वोत्तम समाधान शोधण्याकरिता संकल्पचित्र स्पर्धा राबविण्यात येत आहे. तरी पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व वास्तुविशारद (Architect) व वास्तुविशारद महाविद्यालयातील विद्यार्थी व इच्छुक नागरिक यांचेकडून सदर संकल्पचित्र स्पर्धेमध्ये सहभागी होणेकरिता जाहीर आवाहन करण्यात येत आहे. सदर स्पर्धेमध्ये ०३ सहभागींची पारितोषिकासाठी निवड करण्यात येणार असून खालीलप्रमाणे पारितोषिक देण्यात येणार आहेत.

अ.क्र.	विजेता स्थान	पारितोषिक	प्रशस्तीपत्रक
१	प्रथम क्रमांक	रु.३१,०००	प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह
२	द्वितीय क्रमांक	रु.२५,०००	प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह
३	तृतीय क्रमांक	रु.११,०००	प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह

सदर संकल्पचित्रांमध्ये खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.

अटी :-

१) शौचालय सर्व सीटमधील भांडी सुस्थितीत राहण्यासाठी योग्य साहित्य (Material) सुचिवणे.
२) शौचालयातील सर्व सीटमध्ये नळ कनेक्शनची तसेच फ्लशिंगची सुविधा असणे.
३) सर्व शौचालयांना Under Ground Water Tank & Over Head Water tank ठेवणे.
४) सर्व शौचालयांना सेप्टीक टँक / Drainage Connection.
५) दिव्यांग व्यक्तीकरिता शौचालयास रॅम्प आणि पक्के रेलिंगची व्यवस्था असणे.
६) सर्व शौचालयांमध्ये महिला / पुरुष कक्ष स्वतंत्र असणे.
७) सर्व शौचालयांमध्ये महिला / पुरुष स्वतंत्र कक्षामध्ये वॉश बेसिन असणे.
८) दिव्यांग व्यक्तीच्या कमोड (English) भांड्याजवळ एक मजबूत हॅण्डल असणे.
९) शौचालयाच्या सर्व सीट्समध्ये मुबलक विद्युत व्यवस्था असणे.
१०) प्रत्येक सीट्यमध्ये मुबलक वायुवीजन / Ventilation ची व्यवस्था असणे.
११) शौचालयाच्या भिंती व फरशी.
१२) महिला शौचालयात सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन व incinration असणे.
१३) लहान मुलांसाठी कमी उंचीचे / भारतीय पद्धतीने शौचालय असावे त्यासाठी उपाययोजना असावी.
१४) शौचालयावर जाहिरातीसाठी जागा असावी.
१५) शौचालयांमध्ये Hand Wash ची सुविधा असावी.

सदर कामी ६ सिट (पुरुष ३ + महिला ३), १० सिट (पुरुष ५ + महिला ५), १६ सिट (पुरुष ८ + महिला ८) व २० (पुरुष १० + महिला १०) सिट प्रति युनिट याप्रमाणे ४ प्रकारे संकल्पचित्र देण्यात यावे.

सदर स्पर्धेअंतर्गत संकल्पचित्र जमा करण्याची अंतिम तारीख ०५/०१/२०२३ दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील.

जा.क्र.पमपा/घकवि/२५२२/प्र.क्र.७३१/८४३/२०२२
दिनांक : १६/१२/२०२२

सही/-
श्री.सचिन पवार
उपायुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका